IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** येवला तालुका

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0410 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 27/07/2026 17:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 7
   **Date From (दिंनाक पासून):** 20/04/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 20/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 20:12 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 21:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 27/07/2026 **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 27/07/2026 17:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 17 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पाटोदा - येवला रोड वरील विशाखा,गार्डन मंगल कार्यालय, पाटोदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): योगेश भास्कर शिंदे

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 18/05/1983

**(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | Deolali camp,Deolali camp,Nashik,देवळाली कॅम्प ,नाशिक शहर,महाराष्ट्र,422401,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,Nashik,नाशिक शहर,महाराष्ट्र, 422401,भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9403865681

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हर्षवर्धन बहिर | | | 1. येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण,येवला तालुका, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुनिल बोराडे | | | 1. पाटोदा तायेवला जिनाशिक, येवला तालुका,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 3 | जगदीश बोराडे | | | 1. पाटोदा तायेवला जिनाशिक, येवला तालुका,नाशिक ग्रामीण, |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

गुरनं व कलम- 410/2026 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अ, 12 प्रमाणे
फिर्यादी- श्री. योगेश भास्कर शिंदे, वय- 37 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक मोबाईल नंबर 9403865681
आरोपी- 1) लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी, नेमणुक येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण 2) खाजगी इसम नामे सुनिल बोराडे 3) खाजगी इसम नामे जगदीश बोराडे आरोपी.क्र 02 व 03 रा.पाटोदा ता.येवला जि.नाशिक.
अप.घ.ठिकाण- पाटोदा - येवला रोड वरील विशाखा गार्डन मंगल कार्यालय, पाटोदा ता.येवला जि. नाशिक.
अप.घ.ता.वेळ- दिंनाक 09/04/2026रोजी 20/12 वाजता ते 21/18 वाजताच्या दरम्यान.
प्रकार- वरील ता.वेळी यातील तक्रारदार श्री. जनार्दन भास्कर नाईकवाडे यांनी दिंनाक 09/04/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरून त्यादिवशीचे 20/12 वाजता ते 21/18 वाजताच्या दरम्यान तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांचा भाऊ सुनिल नाईकवाडे यास येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथील गुन्हा नोंद क्रमांक 63/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 137(2) प्रमाणे दाखल गुन्हयात आरोपी न करणे व त्यास नमुद गुन्हयात अटक न करण्याचे मोबदल्यात लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचे सांगणेवरून व त्यांचे वतीने खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेकडे 4,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन दिंनाक 09/04/2026 रोजी खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचेशी भेट करुन देण्याकरीता फोन पे द्वारे तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेकडुन लाच रकमे पैकी 50,000/- रुपये स्विकारुन त्यानंतर लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचे सांगणे वरुन खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेकडे तडतोडी अंती 2,50,000/- रुपये (अक्षरी-अडीच लाख) लाचेची मागणी करून मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. तसेच सदर लाचेची रक्कम लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना देण्यासाठी खाजगी इसम नामे जगदीश बोराडे याने तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांना प्रोत्साहन दिले आहे म्हणुन गुन्हा.
दाखल- पोउपनि/ आण्णासाहेब विठ्ठल दिघे. मो.नं. 9209079436
तपास – पोलीस निरीक्षक राहुलकुमार नाईक नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक मो.नं. 7972210736

फिर्याद येवला तालुका पोलीस ठाणे, ना.ग्रा.
दिंनाक:- 27/07/2026

माझे नांव श्री. योगेश भास्कर शिंदे, वय- 37 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक मोबाईल नंबर 9403865681
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असुन



Scanned with OKEN Scanner

दिंनाक 13/06/2026 रोजी पासुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नाशिक परिक्षेत्र कार्यालय नाशिक येथे
नेमणुकीस आहे.
दिंनाक 09/04/2026 रोजी श्रीमती पुनम भागवत केदार, पोलीस निरीक्षक तत्कालीन नेमणुक लाचलुचपत
प्रतिंबधक विभाग, नाशिक यांनी शासकिय पंच श्री. अशोक राजाराम मुर्तडक व श्री.नितीन सुरेश सोनार यांचे
उपस्थितीत येवला तालुक्यातील पाटोदा गावाजवळ असलेल्या पिंपळगांव लेप गावापासुन पुढे अर्धा किलोमीटर
अंतरावर याठिकाणी तक्रारदार श्री. जनार्दन भास्कर नाईकवाडे यांना त्यांची तक्रार विचारून ती त्यांना लिहुन
देण्यास सांगितल्याने त्यांनी त्यांची तक्रार लिहुन दिली ती खालीलप्रमाणे
'' माझे नांव श्री. जनार्दन भास्कर नाईकवाडे, वय- 27 वर्षे, व्यवसाय- शेती, राहणारः- दहेगांव- शिंरसगाव
शिवरस्ता, पाटोदा, ता. येवला, जि. नाशिक
मी वरील ठिकाणी माझे कुटुंबीयांसह राहत असुन मी शेती करून माझे कुटुंबीयाचा उदरर्निवाह करतो. माझा मोठा
भाऊ सुनिल भास्कर नाईकवाडे याचे आमचे गावातील मुलगी कावेरी उमेश रहाणे हिचेसोबत लग्न ठरले होते. परंतु
तीचे वय 18 वर्षा पेक्षा कमी असल्याने आम्ही मुलगी कावेरी हिचे वय 18 वर्ष पुर्ण झाल्यानंतर तीचेशी माझा मोठा
भाऊ सुनिल भास्कर नाईकवाडे याचे लग्न करणार होतो.
त्यानंतर दिंनाक 17/02/2026 रोजी आमच्या गावातील शुभम बाळासाहेब भालेराव हा मुलगी कावेरी उमेश
रहाणे हिस पळवुन घेवून गेला असल्याने मुलगी कावेरी हिची आई सिमा उमेश रहाणे यांनी शुभम बाळासाहेब भालेराव
याचेविरूध्द येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे फिंयाद दिल्याने त्याचेविरूध्द गुन्हा नोंद क्रमांक
63/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 137(2) प्रमाणे दिंनाक 18/02/2026 रोजी गुन्हा दाखल
झालेला आहे. त्यानंतर काही दिंवसानी शुभम बाळासाहेब भालेराव व मुलगी कावेरी उमेश रहाणे हे दोघेही येवला
तालुका पोलीस ठाणे येथील पोलीसांना मिळुन आले असुन त्यांनी शुभम बाळासाहेब भालेराव याचेविरूध्द कायदेशीर
कारवाई केली आहे. आता सध्या वरील नमुद गुन्हयाचा तपास येवला तालुका पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी
हर्षवर्धन बहिर हे करीत आहे. माझा मोठा भाऊ सुनिल नाईकवाडे याचा वरील नमुद गुन्हयाशी कोणताही संबंध
नसतांना पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर हे त्यास वरील नमुद गुन्हयात आरोपी करून त्यास गुन्हयात अटक
करण्याची भिती आम्हास दाखवित आहे. म्हणुन मी, पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर यांच्या ओळखीचा व माझ्या
ओळखीचा असलेला आमचे गावातील सुनिल बोराडे यास भेटुन त्यास वरील प्रकार सांगितला.
त्यानंतर मंगळवार दिंनाक 07/04/2026 रोजी मला, सुनिल बोराडे याने 'तुला पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर
यांनी पाटोदा गावाजवळील विशाखा गार्डन मंगल कार्यालयाजवळ बोलाविले आहे' असा निरोप दिल्याने मी मंगळवार
दिंनाक 07/04/2026 रोजी सायंकाळी 07/00 ते 08/00 वाजेच्या दरम्यान येवला तालुका पोलीस ठाणे येथील
पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर यांना आमच्या पाटोदा गावाजवळील पाटोदा-येवला रोडवरील विशाखा गार्डन मंगल
कार्यालयाजवळ भेटलो. त्यावेळी सुनिल बोराडे हा देखील उपस्थित होता. त्यावेळी पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर
यांनी वरील नमुद गुन्हयात पोक्सो कायदयाचे कलम लागले असुन तुझा भाऊ सुनिल नाईकवाडे यास वरील नमुद
गुन्हयात आरोपी करून त्यास अटक करायची आहे असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना असे करू नका असे
सांगितले. त्यावेळी पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर यांनी माझा भाऊ सुनिल नाईकवाडे यास वरील नमुद गुन्हयात
आरोपी न करणे व त्यास गुन्हयात अटक न करण्याचे मोबदल्यात माझ्याकडे 4,00,000/- रूपये लाचेची मागणी
केली. त्यावेळी मी त्यांना आम्ही शेती करतो, आमच्याकडे एवढे पैसे नाही असे सांगितले. परंतु त्यांनी मला
4,00,000/- रूपये दयावेच लागतील असे सांगितले. त्यावेळी सुनिल बोराडे याने देखील मला, बहिर साहेबांना
4,00,000/- रूपये पुर्ण दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्या दोघांना आता सध्या माझ्याकडे पैसे
नाही, परंतु दोन-तीन दिंवसात पैशांची व्यवस्था करतो असे सांगितले असता पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर व
सुनिल बोराडे यांनी मला दोन दिंवसात पैशांची व्यवस्था कर, दोन दिंवसानी पाटोदा गावात 4,00,000/- रूपये
घेवून ये असे मला सांगितले.
मी आज दिंनाक 09/04/2026 रोजी येवला तालुका पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर व
सुनिल बोराडे यांना भेटण्यासाठी पाटोदा गावात जाणार असुन त्यावेळी ते दोघेही माझ्याकडे लाचेची मागणी करतील
व मी त्यांना लाच न दिल्यास पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर हे माझा भाऊ सुनिल नाईकवाडे यास वरील नमुद
गुन्हयात आरोपी करून त्यास अटक करतील. मला पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर व सुनिल बोराडे यांना लाच
देण्याची इच्छा नाही. माझ्यात आणि पोलीस अधिकारी हर्षवर्धन बहिर तसेच सुनिल बोराडे यांच्यात कोणताही
आर्थिक व्यवहार नसुन कोणतेही वैर नाही. तरी सदरबाबत पडताळणी करून त्यांचेवर कायदेशिर कारवाई करणेस
विंनती आहे.''
तक्रारदार श्री. जनार्दन भास्कर नाईकवाडे यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने श्रीमती पुनम केदार, पोलीस



Scanned with OKEN Scanner

निरीक्षक, तत्कालीन नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी दिंनाक 09/04/2026 रोजी लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी व त्यांचे ओळखीचा खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हे खरोखरच तक्रारदार श्री. जनार्दन भास्कर नाईकवाडे यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे व पंच क्रमांक 1 श्री. अशोक राजाराम मुर्तडक यांचेसह पडताळणी कारवाईकामी आवश्यक त्या सुचना देवून तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांचेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवून त्यांचे कडील मोटार सायकलने पाटोदा गावात पाठविले. त्यावरून तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे व पंच क्रमांक 1 श्री. अशोक मुर्तडक असे मोटार सायकलने पाटोदा गावात गेले असता पाटोदा गावातील पाराजवळ/चैकात तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांची लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचे ओळखीचा खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यांचेशी भेट झाली. त्यावेळी खाजगी इसम सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांना '' ऐ नई रे बाबा तुला म्हणलो न एक लाख का व्हईना '' असे म्हणुन लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना भेटण्यापुर्वी तु त्यांना देण्यासाठी माझ्याकडे एक लाख रूपये आता लगेच दे असे सांगितले. त्यावर तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांनी खाजगी इसम सुनिल बोराडे यास '' त्याचे स्वतः देखत घाल तु मला घेऊन '' असे म्हणुन लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांची भेट करून देणेबाबत सांगितले असता तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांनी लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना देण्यासाठी एक लाख रूपये आणले नाही त्यामुळे त्यांची भेट करून देण्यासाठी खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने असमर्थता दर्शविली. त्यावेळी तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांनी खाजगी इसम सुनिल बोराडे यास '' नही हे नही निघु राहिले हे पहा तुला पन्नास टाकतो, लगेच टाकतो '' असे म्हणुन तुला आता पन्नास हजार ऑनलाईन पाठवितो असे सांगुन खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांची भेट करून द्यावी म्हणुन व त्याचा तक्रारदार यांचेवर विश्वास बसावा म्हणुन तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांनी त्यांचे मोबाईल फोन मधील फोन पे व्दारे पन्नास हजार रूपये हे खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याचे फोन पे वर ऑनलाईन पाठविले. त्यानंतर खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हा लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांची भेट करून देण्यासाठी तयार झाला. त्यानंतर खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क साधुन त्यांना तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे हे भेटण्यासाठी आले असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांनी सांगितल्या प्रमाणे तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे व पंच क्रमांक 1 श्री. अशोक मुर्तडक असे त्यांचेकडील मोटार सायकलने व खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हा त्याचे मोटार सायकलने पाटोदा-येवला रोडवरील पाटोदा गावापासुन अंदाजे एक किलोमिटर अंतरावर असलेले विषाखा गार्डन मंगल कार्यालयाच्या बाहेरील परिसरात गेले. त्यानंतर दोन ते तीन मिनीटातच तेथे स्कॉर्पिओ या चारचाकी वाहनाने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी हे आले. त्यानंतर खाजगी इसम नामे सुनिल बोराडे व तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे हे स्कॉर्पिओ या वाहनात बसले. त्यावेळी खाजगी इसम सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांना '' तु जे सांगितले है ते टपटप जे काय कमी असले ते जमा कर ते शंभर टक्के सहकार्य करतील टेंशन नको घेऊ '' असे बोलुन लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांनी लाचेची एकुण रक्कम चार लाख रूपये सांगितले असुन त्यापैकी तु पन्नास हजार रूपये फोन पे व्दारे दिले असुन उर्वरीत लाचेची संपुर्ण रक्कम जमा करून दे, तुझ्या भावाला ते सहकार्य करतील असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी व त्यांचे ओळखीचा खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यांचे तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेशी तक्रारदार यांचा भाऊ सुनिल नाईकवाडे यास गुन्हयात अटक न करण्याच्या अनुशंगाने संभाषण झाले. त्यानंतर काही वेळाने तेथे खाजगी इसम जगदीश बोराडे हा देखील आल्याने तो देखील स्कॉर्पिओ या वाहनात बसला. त्यानंतर तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांनी लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना '' हे सांगा काही थोड कमी सांगा न त कस काय करायच '' असे बोलुन लाचेची रक्कम कमी करण्यासाठी सांगितले असता लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांनी तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांना ''जा बाहेर डिस्कस करा, जा बाहेर तिकड जा'' असे बोलुन तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे व लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर यांचे ओळखीचा खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यांना स्कॉर्पीओ या वाहनामधुन बाहेर जाऊन लाचेची रक्कम कमी जास्त करण्याविषयी चर्चा कर असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांनी लाचेची रक्कम पुन्हा कमी करण्यासाठी खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यास '' दोन पर्यंत बघ ना '' असे म्हणुन लाचेची रक्कम कमी करून दोन लाख रूपये पर्यंत होईल काय अशी विचारणा केली असता खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांना '' आ दोन पर्यंत नही ऐकणार, त्याला अडीच पर्यंत म्हणुन पाहतो मी '' असे म्हणुन लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी हे दोन लाख रूपये पर्यंत ए◌ैकणार नाही, त्यांना अडीच लाख रूपये सांगुन पाहतो असे सांगितले. त्यानंतर खाजगी इसम नामे सुनिल

बोराडे हा लाचेची रक्कम कमी करण्यासाठी लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी हे बसुन असलेल्या स्कॉर्पीओ या वाहनात बसला. खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याची लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचेशी लाचेच्या रक्कमे विषयी चर्चा झाल्यानंतर काही वेळाने खाजगी इसम नामे सुनिल बोराडे व खाजगी इसम नामे जगदीश बोराडे हे स्कॉर्पीओ या वाहनामधुन उतरुन बाहेर आले. त्यानंतर खाजगी इसम नामे जगदीश बोराडे हा तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यास '' जाऊदे मरूदे आपल काम होतय ना देऊन टाकायच त्याच्या याची '' असे म्हणुन '' हि भी मदत लई मोठी हे तुला एक सांगु का जना कोणी मधी नही पडत हे जाळ, हे जाळ, हा, हा हे लोक कोणताही अधिकारी ना, भाऊ आपण किस झाड की पत्ती इध आमदार, खासदार, मंत्री यांना सोडत नाही, याच्यात हातात ते काय करायचे ते '' असे बोलुन लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांना देण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे.

त्यानंतर खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हा तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यास '' हा तेचना भाऊ एॅक उदया पाच वाजे पर्यंत अडीच लाख रुपये तुझ्याकडुन नही झाले, तु तुझा मॅटर अण तु '' असे म्हणुन लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचे सांगणेवरून व त्यांचे वतीने खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेकडे 2,50,000/- (अक्षरी-अडीच लाख रुपये) लाचेची मागणी करून मागणी केलेली लाचेची रक्कम उदया पाच वाजता पर्यंत देण्यास सांगितले असुन सदर लाचेची रक्कम लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना देण्यासाठी खाजगी इसम नामे जगदीश बोराडे याने प्रोत्साहन दिले आहे. सदर बाबत श्रीमती पुनम भागवत केदार, पोलीस निरीक्षक तत्कालीन नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक यांनी सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला आहे.

त्यानंतर दिनांक 10/04/2026 रोजी श्रीमती पुनम भागवत केदार, पोलीस निरीक्षक तत्कालीन नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक यांनी शासकिय पंच नामे श्री. अशोक राजाराम मुर्तडक व श्री. नितीन सुरेश सोनार यांचे उपस्थितीत बनकर खडी क्रेशर कारखान्याजवळ निळखेडा - मुरमी रोड, ता. येवला, जि. नाशिक याठिकाणी सापळापुर्व पंचनामा करून तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांना लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी व त्यांचे ओळखीचा खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हे लाचेची रक्कम स्विकारणेकामी कोठे भेटणार आहेत ? याची खात्री करण्यासाठी खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्यास सांगितला. त्याप्रमाणे तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांनी खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याचे मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी हे लाचेची रक्कम स्विकारण्यासाठी पाटोदा येथे आले नसल्याची अथवा त्यांनी लाचेची रक्कम घेवून कोठे यायचे याबाबत काही एक न सांगितल्याची खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याचेशी झालेल्या संभाशणावरून खात्री झाल्याने पुढील कारवाई स्थगित केली. सदर बाबत श्रीमती पुनम भागवत केदार, पोलीस निरीक्षक तत्कालीन नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक यांनी सापळापुर्व व स्थगिती पंचनामा केला आहे.

त्यानंतर दिनांक 11/04/2026 रोजी श्रीमती पुनम भागवत केदार, पोलीस निरीक्षक तत्कालीन नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक यांनी तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांचेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवून त्यांना 2,50,000/- (अक्षरी- अडीच लाख रुपये) लाचेची रक्कम घेवून पंच क्रमांक 1) श्री. अशोक मुर्तडक यांचेसह लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी व त्यांचे ओळखीचा खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यांचे भेटीकरीता पाटोदा गावालगत असलेल्या मार्केट मध्ये रवाना केले असता तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांची खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यांचेषी भेट झाली. त्यावेळी तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचे खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याचेशी संभाशण झाले. तसेच खाजगी इसम सुनिल बोराडे याने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क साधुन त्यांना '' कुठ ये साहेब, कुठ ये म्हणल, बर, किती वेळ लागल, पंधरा मिनिट येता इकड मार्केट कडं, हम बोलुन घेता काय '' असे म्हणुन त्यांना तेथे पोहचण्यासाठी किती वेळ लागेल याबाबत विचारणा केली. त्यानंतर लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी हे तेथे न आल्याने खाजगी इसम सुनिल बोराडे याने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना पुन्हा मोबाईल फोनव्दारे संपर्क साधुन त्यांना '' हॅलो, काओ कुठे ये म्हटल, काय बात मारता, ये बाबो, मंग आता '' असे म्हणुन त्यांना कुठे आहे याबाबत विचारणा केली. त्यावर लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांनी '' नही तुला नहीका म्हणल गुन्हयाचे तपासकामी आलो मी अ त्याच्यामुळ निघुन आलो मी लोकेशन भेटल तिकड आलो '' असे सांगुन गुन्हयाचे तपासकामी बाहेर आलो आहे असे सांगितले. त्यानंतर खाजगी इसम सुनिल बोराडे याने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर यांना व्हॉट्सॲप द्वारे कॉल करून संभाषण केले की, '' मी ताब्यात घेऊन टाकतो '' असे म्हणुन तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांनी आणलेले पैसे/लाचेची रक्कम ताब्यात घेतो असे सांगितले. त्यावर लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांनी खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यास ''इकड ये न आज



Scanned with OKEN Scanner

थोड वातावरण वेगळ वाटतय मला तु काय रिक्स घेऊ नको'' असे बोलुन लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर यांना
संशय आल्याने  त्यांनी सुनिल बोराडे यास तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारण्यास स्पष्ट नकार दिला.
त्यानंतर तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचे खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याचेशी संभाषण झाले. त्यानंतर
खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हा तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांना '' तो शंका घेऊ राहिला '' असे म्हणुन
लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी हा तुझ्यावर संशय घेत असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार
नामे जनार्दन नाईकवाडे हे खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यास '' आपण काय असं करणार काय ?'' असे
म्हणाले. त्यानंतर खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हा तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांना '' पहा म विचार करा
अजुन दोन चार दिवस, पंधरा दिवस तो पर्यंत जुगाड होत असल एखादा त तस करा ते पर्यंत जत्रा होते मयावली मी
भी बिजी इकड अजुन दोन-चार आठ जणांचे सल्ले घे ते काय म्हणता ते पहाय म भेट '' असे म्हणुन पाटोदा गावात
यात्रा/जत्रा असल्याने तो पाटोदा गावातील यात्रा/जत्रा होईपावेतो व्यस्त असुन यात्रा/जत्रा संपल्यानंतर भेटण्यास
बोलाविले असल्याने पुढील कारवाई स्थगित केली असुन तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांचा भाऊ सुनिल
नाईकवाडे यास गुन्हयात आरोपी न करणे व त्यास गुन्हयात अटक न करण्याचे मोबदल्यात लोकसेवक नामे हर्षवर्धन
बहिर, पोलीस अधिकारी यांचे सांगणेवरून व त्यांचे वतीने खाजगी इसम नामे सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे
जनार्दन नाईकवाडे यांचेकडे मागणी केलेली 2,50,000/- रुपये (अक्षरी-अडीच लाख) लाचेची रक्कम स्विकारली
नाही. सदर बाबत श्रीमती पुनम भागवत केदार, पोलीस निरीक्षक तत्कालीन नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक यांनी स्थगिती पंचनामा केला आहे.
लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचे सांगणेवरून व त्यांचे वतीने खाजगी इसम नामे सुनिल
बोराडे याने तक्रारदार श्री.जनार्दन नाईकवाडे यांचेकडे लाचेची मागणी केल्याप्रमाणे ते लाच स्विकारणेकामी संपर्क
करतात अगर कसे ? याबाबत दिंनाक 25/05/2026 रोजी पावेतो प्रतिक्षा केली. परंतु त्यांना तक्रारदार श्री.
जनार्दन नाईकवाडे यांचा संशय आल्याने त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम आणुन देणेकामी तक्रारदार श्री.
जनार्दन नाईकवाडे यांना संपर्क केला नाही. त्यामुळे लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी व त्यांचे
ओळखीचा खाजगी इसम नामे सुनिल बोराडे हे तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम 2,50,000/- रूपये स्विकारणार
नाहीत याची तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे खात्री झाली असल्याने आम्ही मा. पोलीस अधिक्षक सा○, ला.प्र.
वि. नाशिक यांना सदर लाच मागणी प्रकरणाचा अहवाल सादर केला असता मा. पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.
नाशिक यांचे जा.क्र. लाप्रवि/नापना/ गुन्हा दाखल परवानगी/4445/2026 दिंनाक 24/07/2026 अन्वये 1)
लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी, नेमणुक येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण 2) खाजगी
इसम नामे सुनिल बोराडे 3) खाजगी इसम नामे जगदीश बोराडे यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे
कलम 7 अ, 12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली आहे.
तरी, तक्रारदार श्री. जनार्दन भास्कर नाईकवाडे यांनी दिंनाक 09/04/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरून
त्यादिवशीचे 20/12 वाजता ते 21/18 वाजताच्या दरम्यान तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांचा भाऊ सुनिल
नाईकवाडे यास येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथील गुन्हा नोंद क्रमांक 63/2026 भारतीय न्याय
संहिता 2023 चे कलम 137(2) प्रमाणे दाखल गुन्हयात आरोपी न करणे व त्यास नमुद गुन्हयात अटक न
करण्याचे मोबदल्यात लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचे सांगणेवरून व त्यांचे वतीने खाजगी
इसम नामे सुनिल बोराडे याने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेकडे 4,00,000/- रुपये लाचेची मागणी
करुन दिंनाक 09/04/2026 रोजी खाजगी इसम नामे सुनिल बोराडे यांने लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस
अधिकारी यांचेशी भेट करुन देण्याकरीता फोन पे द्वारे तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेकडुन लाच रकमे पैकी
50,000/- रुपये स्विकारुन त्यानंतर लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांचे सांगणे वरुन खाजगी
इसम नामे सुनिल बोराडे यांने तक्रारदार नामे जनार्दन नाईकवाडे यांचेकडे  तडतोडी अंती 2,50,000/- रूपये
(अक्षरी-अडीच लाख) लाचेची मागणी करून मागणी केलेली लाचेची रकम स्विकारण्याची तयारी दर्शविली. तसेच
सदर लाचेची रक्कम लोकसेवक नामे हर्षवर्धन बहिर, पोलीस अधिकारी यांना देण्यासाठी खाजगी इसम नामे जगदीश
बोराडे याने तक्रारदार श्री. जनार्दन नाईकवाडे यांना प्रोत्साहन दिले आहे म्हणुन माझी 1) लोकसेवक नामे हर्षवर्धन
बहिर, पोलीस अधिकारी, नेमणुक येवला तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण 2) खाजगी इसम नामे सुनिल बोराडे
3) खाजगी इसम नामे जगदीश बोराडे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अ, 12 प्रमाणे
कायदेशीर फिंयाद आहे.

माझी वरील टंकलिखीत केलेली फिंयाद मी वाचुन पाहिली असता ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष                                 ही फिंयाद दिली

दिंनाक:- 27/07/2026



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SANDIPKUMAR NARAYAN BORSE(I (Inspector)) / BCMH01846 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

पोलीस ठाणे अंमलदार
देगलूर ठाणे पो.स्टे.

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANDIPKUMAR NAR/
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH91846

27/7/26.

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner

**Attachment to Item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या OT खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माडिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner